# लहान मुलांच्या पालकांसाठी



प्रा. रमेश पानसे

# भूमिका

**ग्राममंगल** ही संस्था बालशिक्षणाच्या आणि प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षे काम करीत आहे. त्यातही , ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात शिक्षणाविषयक नवनवीन प्रयोग करीत आहे. शास्त्रीय शिक्षणविषयक पद्धतीचा प्रसार होण्यासाठी प्रशिक्षण वर्गही चालवीत आहे. ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांच्या शैक्षणिक संकल्पनांचा वारसा घेऊनच ग्राममंगलचे शिक्षणविषयक संशोधन व विकासाचे कार्य चालू आहे बालशिक्षणविषयक समाज प्रबोधनाच्या कार्यात, आपल्या परीने काही करावयाचे ग्राममंगलने ठरविले आहे.

पालकांचे प्रबोधन हीच बालकांच्या शिक्षणाची पहिली पायरी आहे. पालकांचा वाचनप्रतिसाद ही त्यांच्या मुलांबाबतच्या आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी उपयुक्त ठरणारी गोष्ट आहे.

आपल्या मुलांच्या वाढीमध्ये पालकांना, अधिक परिणामकारक काम करता यावे आणि मुले वाढविण्याची प्रक्रिया त्यांना आनंददायक व्हावी हाच या पुस्तिकेमागचा हेतू आहे.

© ग्राममंगल

रमेश पानसे
विश्वस्त – ग्राममंगल

## बालकांचे कुटुंबातील स्थान

- बालक ही एक स्वतंत्र व्यक्ती आहे. तिच्या प्रत्येक वयाला ती एक पूर्ण व्यक्ती असते.
- बालकाला तुमच्यापेक्षा वेगळे, पण स्वत:चे विचार असतात.ते ऐकून घ्या. समजून घ्या. त्यांचा आदर करा.
- बालकाला स्वत:च्या भावना असतात. त्यांना कमी मानू नका. त्याच्या भावनांना समजून घ्या. त्यांच्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न करा.
- बालकाचे स्वत:चे असे एक कल्पनाविश्व असते. त्याला अनंत कल्पना सुचत असतात. त्यांची चेष्टा करू नका. दुर्लक्ष तर मुळीच करू नका. त्याच्या कल्पनांशी समरस व्हाव.
- बालकाला घरात पूर्ण व्यक्तीचे स्थान द्या. त्याला त्याच्या वस्तूंसाठी स्वत:चा कोपरा असू द्या. त्याच्या वस्तूंना कचरा समजू नका. त्याविषयी आपुलकी दाखवा.
- बालक हा तुमच्या घरातील, तुमच्याइतकाच महत्त्वाचा घटक आहे. त्याचा सन्मान राखा.

## कौटुंबिक वातावरण

- तुमचे मूल ही कुटुंबातील एक प्रमुख व्यक्ती आहे. त्याच्या मताला, सूचनांना, विरोधाला किंमत द्या.
- तुमच्या मुलाला, अगदी ठरवून, निश्चित थोडा तरी वेळ द्या.तुमचे त्याचे नाते घट्ट होण्याच्या दृष्टीने हे आवश्यक आहे.
- मुलांना स्वतःचे कार्यक्रम आखू द्या. त्यांच्या सांगण्यानुसार त्यांत मनापासून सामील व्हा.
- मुलांना स्वयंपाकाच्या कामात लुडबुड करायला आवडते. त्यांना सहभागी होऊ द्या. छोटी छोटी कामे त्यांच्यावर सोपवा. वाटी-चमचा धुणे, पुसणे, जागेवर ठेवणे, इकडून तिकडे भांडी नेणे या गोष्टी मुलांना करता येतात, आवडतात.
- महिन्यातून एकदा तरी घराच्या स्वच्छतेचे काम काढा. त्याच्यात नियोजनापासून मुलांना सहभागी होऊ द्या.
- बागकाम, कुंडीकाम हे मुलांच्याच मदतीने करा. झाडे वाढताना मुलांना झाडांचे निरीक्षण करण्यास सांगा.
- महिन्याच्या खरेदीची यादी करणे, प्रत्यक्ष खरेदी करणे, वस्तू घरात नीट ठेवणे यात मुलांचा विचार व सहभाग घ्या.

## सामाजिक वातावरण

- सहलीला जातो, तसे महिन्यातून एक-दोन वेळा घरातच सर्व मिळून वेगळ्या जागी जेवायला बसा. मुलाच्या एखाद्या मित्राला, मैत्रिणीला यासाठी आवर्जून बोलवा.
- मुलांना कुटुंबाबाहेर नातेवाइकांकडे नेण्याचा सराव ठेवा.
- मुलांना शेजाऱ्यांच्या घरी मोकळेपणाने जाऊ द्या. शेजारच्या मुलांना तुमच्या घरी येऊ द्या. अधूनमधून शेजारी, मित्र यांच्या कुटुंबांबरोबर अंगत-पंगत करा, मुलांना असे छोटे समारंभ खूप आवडतात.
- मुलांना नवनवीन मित्र-मैत्रिणी मिळतील असा प्रयत्न करा.
- मुलांना शेजारी, मित्र-मैत्रिणी, नातेवाईक यांच्याकडे राहायला पाठवा. तुमच्याही घरी पाहुण्या मुलांना बोलवा. त्यांचा नीट पाहुणचार करा.
- मुलांसमोर मुलांच्या मित्र-मैत्रिणींचा आदर करा.
- मुलांसमोर पाहुण्यांना सन्मानाने वागवा. पाहुण्यांसमोर मुलांनाही तेवढेच सन्मानाने वागवा.

# आहार

- प्रौढ माणसाच्या अर्धे अन्न तरी मुलांनी खाल्ले पाहिजे.
- मुलांना थोड्या थोड्या वेळाने थोडे थोडे अन्न द्यावे.
- कुटुंबातील सर्व सदस्य जे अन्न खातात ते सर्व पदार्थ मुलांना दिले जावे.
- मुलांच्या जेवणात मसाले, तिखट, मिरची यांचा वापर मर्यादित असावा.
- मुलांच्या आहारात पालेभाज्यांचा समावेश नियमित असावा.
- बालवाडीत आहार मिळत असला तरी मुलांना घरचे अन्न भरपूर प्रमाणात मिळावे.
- आजारपणात वैद्यकीय सल्ल्याशिवाय मुलांचा आहार कमी करू नये.
- बालकाच्या प्रत्येक अवस्थेत त्याची अधिकतम प्रगती साधणे, हेच दर्जेदार बालसंगोपनाचे अंतिम ध्येय आहे.

## आरोग्य

- बालक नाकाने श्वासोच्छ्वास करते ना ? त्याचा श्वासोच्छ्वास तोंडाने असतो का? श्वासोच्छ्वास सहजपणे, न अडखळता होतो ना ?
- मुलाला भूक चांगली लागते ना ? खाण्याच्या काही तक्रारी नाहीत ना ? नवे पदार्थ खावेसे त्याला वाटते का? खायचा कंटाळा करत नाही ना ?
- मुलाच्या हिरड्या गुलाबी व कणखर आहेत ना ? ते लवकर थकत नाही ना ? आलेला थकवा लवकर जातो का?
- मुलाला नवनवीन काम करायला आवडते ना ? ते कामाविषयी निरुत्साही किंवा उदासीन नाही ना? त्याला नव्या गोष्टींचे कुतूहल वाटते ना?
- मुलाचे डोळे चमकदार व दृष्टी स्थिर आहे ना ? दृष्टी कमजोर नाही ना?
- मूल विविध आवाजांना उत्तम प्रतिसाद देते का ? त्याच्या ऐकण्यात काही दोष नाही ना ?
- मुलाला रात्री गाढ झोप लागते ना ? मध्येच दचकून उठते का ? झोपेतून आपणहून जाग येते ना? जागे झाल्यावर उत्साही असते ना ?

## खेळ

- तुमच्या लहान मुलांच्या जीवनात खेळ ही अत्यावश्यक गोष्ट आहे. रोज संध्याकाळी मुलांना घराबाहेर खेळू द्या.
- एकट्याने खेळण्यापेक्षा मुलाला इतरांबरोबर खेळण्याची सवय लागायला हवी.
- ज्यात शारीरिक हालचाल अधिक होईल, असे खेळ मुलांनी खेळले पाहिजेत. उदा. धावणे, लंगडी, खोखो, लपाछपी इत्यादी.
- मुलांच्या खेळण्यासाठी खास व्यवस्था करा. मैदाने असू द्या.
- मुलांना पहिल्या पावसात नाचू द्या.
- पावसाळ्यात बाहेर खेळणे शक्य नसेल तर घरात खेळता येईल.
- मुलांच्या खेळण्यात व्यत्यय आणू नका, उलट तुम्हीही त्यांच्या खेळात सहभागी व्हा.
- मुले खेळत असताना त्यांना अभ्यासाची आठवण करू नका.
- निखळपणे खेळणे हेच आरोग्यपूर्ण खेळणे असते.
- एकाग्रतेने खेळणे हेच आनंददायी खेळणे असते.
- खेळण्यासाठी खेळणे हेच खरे खेळणे असते.

# मानसिक विकास

- बालकाचा मानसिक विकास निरोगी व्हावा असे वाटत असेल, तर मुलाच्या मनाचा ताबा तुम्ही घेऊ नका.
- मूल नेहमी चुकत असते, असे मानू नका.
- मुलांना काही समजत नाही, असे मानू नका.
- मूल हा एक मातीचा गोळा आहे, ही कल्पना टाकून द्या.
- मुलाला सतत उपदेश करू नका.
- मुलाने तुमचे ऐकले नाही तरी मुलाला हट्टी समजू नका.
- मुलाला नको असेल तेव्हा त्याच्यावर ती गोष्ट लादू नका.
- बालकांच्या क्षमतेला अनुरूप असेच वातावरण सदैव ठेवा; त्यांना पेलतील अशी आव्हाने त्यांच्यासमोर ठेवा.

## मुलांच्या पालकांकडून अपेक्षा

- माझ्या आई -बाबांनी मला कधीच रागावू नये, माझ्यावर ओरडू नये, माझ्याकडे रागावून बघू नये, घरात चिडचिड करू नये
- आई-बाबा मला मारतात तेव्हा मला दुखते, त्यांचा राग अनावर झालाच, तर त्यांनी तसे सांगितले पाहिजे.
- आई -बाबांनी माझ्याशी कधीही खोटे बोलू नये व मलाही खोटे बोलायला लावू नये.
- मला आई-बाबांच्या सहवासात राहायला खूप आवडते. कधी-कधी पाहुण्यांसमोर, माझ्या मित्रासमोर ते मला त्यांच्यात बसू देत नाहीत: हे मला आवडत नाही.
- मन लावून खेळताना आई बाबांनी माझ्या खेळात लुडबुड करू नये, मला स्वतंत्रपणे व मला हवे तसे खेळू द्यावे. एकटे -एकटे खेळल्याने मला मोठे झाल्यासारखे वाटते.
- जेव्हा माझे माझ्या मित्र-मैत्रिणींशी भांडण होते नि मी रडत घरी येतो, त्या वेळी मला माझ्या आई-बाबांच्या आधाराची खूप गरज असते, मित्रांनी केलेला अपमान, चिडविणे मी त्यांच्या मायेमुळे लगेच विसरून जाऊ शकतो, अशा वेळी त्यांनी मला फक्त जवळ घ्यावे, काही विचारू नये, काही सांगू नये.

- माझ्या आई किंवा बाबांना बरे नसते, दवाखान्यात जावे लागते तेव्हा त्यांनी मला सांगावे. त्यांची अस्वस्थता बघून मला खूप भीती वाटते.
- मला एखाद्या गोष्टीची भीती वाटते , असे मी सांगतो, तेव्हा माझ्या आई-बाबांनी विश्वास ठेवावा. माझी थट्टा करू नये. माझी भीती घालविण्यासाठी तशीच परिस्थिती पुन्हा-पुन्हा आणू नये.
- आई-बाबांच्या आपसातील भांडणामुळे मला असुरक्षित वाटते, भीती वाटते.
- आई-बाबांबरोबर फिरायला जायला खूप आवडते, बागेत, रस्त्यावर, स्कूटरवर, आगगाडीतून जाताना त्यांच्याबरोबर मजा करायला खूप आवडते. ते मजा करायला, फिरायला जातात तेव्हा त्यांनी मला इतर ठिकाणी ठेवून जाऊ नये.
- जेवताना आई-बाबांनी मला सारखे टोकू नये. माझ्या आवडीच्या पदार्थांबरोबरच नावडीचे पदार्थही मी खाऊन पाहीन, पण मला कोणी रागवले, धाक दाखयला तर मलाही राग येतो आणि म्हणूनच मी खायला त्रास देतो.
- मी आई-बाबांचा कोणीतरी आहे. ते माझे लाड करतात, कौतुक करतात, मला आधार देतात. या विचाराने मला खूप बरे वाटते

## ज्ञानलालसा

- मुले ज्ञानासाठी हपापलेली असतात, त्यांना प्रतिसाद द्या.
- मुलांमध्ये ज्ञानप्राप्तीची प्रचंड लालसा असते व त्याकरता ती कितीही कष्ट घ्यायला तयार असतात.
- एखादी वस्तू जोडण्यासाठी, उकलण्यासाठी, ती स्थिरपणे एकाग्रतेने, संपूर्ण अवधानाने बसतात व त्यांचे समाधान होईपर्यंत त्यावर सर्व शक्ती केंद्रित करतात. एवढ्या प्रयत्नांनी समाधान झाले नाही तर तीच क्रिया पुन्हा पुन्हा न थकता, न कंटाळता करून बघण्याची क्षमता दाखवतात. टप्प्या-टप्प्यांनी का होईना, मुले आपल्या संपूर्ण शरीराचा विकास करण्यास स्वत:च शिकतात.
- त्यांच्या दृष्टीने बुद्धीच्या विकासाइतकेच महत्त्व हात, पाय, कान, डोळे यांच्या विकासालाही आहे. ती एका जागी स्थिर न बसण्याचे हे प्रमुख कारण !
- फोडणे, तोडणे, धावणे, चालणे, उड्या मारणे अशा क्रियाशीलतेतून ते संपूर्ण शरीराला व्यायाम देतात. स्नायूंचा सतत होणारा वापर मुलांना स्वत:च्या शरीरावर नियंत्रण आणायला मदत करतो.

# स्वयंशिक्षण

- मुले उपजतच भाषा, गणित, समाजशास्त्र, पदार्थविज्ञान, भूगोल, मनुष्यस्वभाव अवलोकन, एवढे विषय सहजच शिकतात.
- मुले आपल्याभोवतीच्या वस्तूंच्या, परिसराचा, माणसांचा परिचय करून घेताना, आपला अभ्यासक्रम तयार करतात.
- मुले शाळेत जाण्यापूर्वी, त्यांना कोणी शिकविण्यापूर्वीच स्वत:च्या प्रयत्नांनी पुष्कळ शिकत असतात.
- वस्तूंचे रंग, आकार, पोत, वजन यांचे ज्ञान मुलांना न शिकवताच प्राप्त होते. थंडी, उकाडा, तीव्र तापमान यापासून ती स्वत:चे रक्षण करून घ्यायला शिकतात.
- मुले पालकांचे मानस ओळखायला फार लवकर शिकतात. आईचे रागावणे, चिडणे, आनंदी चेहरा पाहून त्यानुसार आपले वर्तन ठेवणे, हे मुले न शिकवताच शिकतात.
- पालकांची शिस्त फार कडक असेल तर मुले स्वत:च्या चुका लपवायला शिकतात.
- मूल स्वत:च्या अनुभवातून शिकते. समाजात वावरण्याच्या अनुभवावरून ते समाजशास्त्र शिकते. समाजाला काय मान्य आहे, काय नाही, काय केले की शिक्षा होते व काय केले की शाबासकी मिळते, हे ते स्वत:च शिकते. मैत्री करणे, सहकार्याने कृती करणे, या गोष्टी मुले समवयस्कांच्या सहवासातून शिकतात.

## बाल-अवलोकन

- मुलांच्या खेळाचे निरीक्षण करा. मुले खेळायला कुठल्या वस्तू वापरतात. मुले उत्स्फूर्तपणे कुठला खेळ खेळतात हे बघा.
- मुलांचे प्रश्न समजावून घ्या. मुले एखाद्या विषयावरचे प्रश्न सतत विचारतात, हे लक्षात घ्या.
- मुलांच्या गप्पा जवळून ऐका. मुले आपापसात किंवा आई-बाबांशी, शिक्षकांशी कुठल्या विषयांवर गप्पा मारतात, ते पाहा.
- मुलांना वाचनाचे साहित्य निवडायला सांगितल्यास त्यांचा कल कोणत्या विषयाकडे असतो, ते कळेल.
- मुलांची उत्स्फूर्त चित्रकला पाहा. अनेक वेळा विषय सुचवूनही मुले विशिष्ट विषयांचेच चित्र काढतात, ते लक्षात घ्या.
- मुलांच्या इच्छा, मुलांना काय हवे, काय व्हायचे आहे, काय बक्षीस हवे असे विचारल्यास मुले काय निवडतात, ते पाहा.
- आपल्या पद्धतीने मुले छान बोलत असतात, ते ऐका.
- मुले आपल्या आवडीचे विषय कसे निवडतात ती प्रक्रिया समजून घ्या.
- मुले स्वतःच्या अनेक चाचण्या घेत घेत, आपल्याला काय आवडते हे पडताळून पाहतात.

# आवडी-निवडी

- आवड म्हणजे अशी एखादी गोष्ट किंवा वस्तू असते, जिच्याशी मुले समरस होऊन स्वतःचे हित, आनंद साधू शकतात, त्यात लहरीपणा, नादिष्टपणा नसतो. वेगवेगळ्या वयात वेगवेगळ्या आवडीची क्षेत्रे निवडण्यात व जोपासण्यात खूप फायदे असतात.
- बालपणी अनेक विषयांत आवड निर्माण झाल्याने मुलांना स्वतःचे मन रमविता येते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू पडतात व सर्वांगीण विकासाला साहाय्य मिळते.
- आवडीमुळे शिकण्यास, नवीन माहिती मिळवण्यास प्रेरणा मिळते. म्हणूनच मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रानुसार शिकण्याची संधी द्यावी.
- मुलांना आवडीची जोपासना करू दिल्यास त्यांच्याचत मोठ्या आकांक्षा निर्माण होतात. परिणामी मुले अगदी बालपणापासूनच भविष्याविषयी विचार करू लागतात. मोठेपणी व्यवसाय निवडीपेक्षा या आवडींची मोठी भूमिका असते.
- आवडींमुळे मुलांचे मनोरंजन होते. आवडीच्या क्षेत्रातील अनुभवांचे मोल मुलांच्या आयुष्यात मोठे असते. ज्या अनुभवात रंजकता नसते त्यात सहभागी होण्यास मुले नाराज असतात. अशा परिस्थितीत ती फारसे कष्टही घेत नाहीत त्यामुळे यशाकडे वाटचाल होत नाही.

# शिक्षण

- लहान मुलांचा शिकण्याचा उपजत वेग मोठ्यांपेक्षा कितीतरी अधिक असतो.
- मूल शिकताना स्वत:च्या चुका स्वत: ओळखते व स्वत:च दुरुस्त करते.
- मुलाला ज्यात रस वाटतो त्याच गोष्टी ते करते.
- मूल चंचल नसते, तर त्याचा मन केंद्रित करण्याचा कालावधी सुरुवातीला छोटा असतो.
- प्रत्येक बालकाला उपजतच काही बुद्धिमता प्राप्त झालेल्या असतात.
- सर्वांना प्राप्त झालेल्या बुद्धिमत्ता समानच असतात,असे नाही.
- वेगवेगळ्या बालकांना वेगवेगळ्या बुद्धिमत्ता कमी-अधिक तीव्रतेने प्राप्त होतात. आपल्या मुलातील बुद्धिमत्तांचा शोध घ्या.
- एका विषयावर स्थिर न राहणे म्हणजे लहरीपणा नव्हे, हेही लक्षात घ्या.

# बालशिक्षण

- सात-आठ वर्षांपर्यंतच्या मुलांचा शारीरिक, मानसिक, सामाजिक कौशल्यांचा व क्षमतांचा विकास म्हणजे बालशिक्षण.
- बालशिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षणाआधीची पायरी नव्हे.
- बालकांचे अनेक अंगाने विकसित होणे, म्हणजेच भाषा समृद्ध करणे, जगाची ओळख करून घेणे, भोवतालच्या माणसांची, वस्तूंची नावे जाणून घेणे, अनुकरण करून बघणे, संपूर्ण शरीराचा वापर करून बघणे, अनेक पदार्थांची चव जाणून घेणे, अनेक वस्तू हाताळून बघणे, याला बालशिक्षण म्हणता येईल.
- बालशिक्षणात अभिप्रेत असलेली विकासाची क्षेत्रे, शारीरिक भावनिक, बौद्धिक, समाजिक, व्यक्तिमत्त्व, सौंदर्य दृष्टिकारक, नैतिक अशी आहेत.
- बालकाच्या उपजत बुद्धिमत्तांचा शोध घेणे, त्याला सराव देणे, वाढीस वाव देणे म्हणजे बालशिक्षण होय.

## घर व शाळा यात सुसंगती

- घर ही स्वाभाविक भावनेतून, प्रेमाच्या पायावर उभारलेली संस्था आहे. तशीच शाळा ही संस्थाही विद्यार्थी व शिक्षक यांच्या स्वाभाविक नात्यावर उभारा.
- घरात एकमेकांबद्दल आपुलकी, जिव्हाळा व प्रेम वाटते, तसे ते शाळेतही वाटू द्या.
- घरात प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते, तसेच शाळेतही दिले जावे.
- घरात जशा प्रत्येक व्यक्तीच्या विशेष गरजा भागू शकतात, तशा शाळेतही मुलांच्या विशेष गरजा भागविल्या जाव्यात.
- घरात जशी मुले मुक्तपणे संचार करीत असतात, मनमोकळेपणाने विहारत असतात, तशीच मोकळीक व स्वातंत्र्य शाळेतही मिळू द्या.
- मुले नव्याने शिकलेल्या कौशल्याचे दृढी करण करण्यासाठी त्या कृती वारंवार करून बघत असतात. घरी त्यांना कोणी हसत नाही. तसेच एखाद्या क्रियेवर, कौशल्यावर प्रभुत्व मिळवण्याची धडपड मुले शाळेत करतात, तेव्हा त्यांना प्रोत्साहन द्यावे, हसू नये.
- घरी जसे मुलाला सुरक्षित वाटते, तसेच वातावरण त्याला शाळेतही मिळू द्या.
- घरात जसे मुलांना कुटुंबातील सर्व व्यक्तींची ओळख, माहिती असते, तशी शाळेतही मुलांना शिक्षक, इतर प्रौढ व इतर मुलांचा परिचय असला पाहिजे.

# बालशिक्षणाचे उद्दिष्टे

- बालकाच्या शारीरिक , मानसिक, बौद्धिक, कलात्मक विकासाचा पाया घालणे, त्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देणे.
- वैयक्तिक व सामाजिक आरोग्य, आहार व वर्तनाच्या चांगल्या सवयींचे बीजारोपण करणे, त्यासाठी योग्य अनुभव देणे.
- मुलांमध्ये उपजत असलेल्या ज्ञानप्राप्तीच्या लालसेचे पोषण करणे, शिकवण्यापेक्षा मुलांना शिकण्यासाठी अभिमुख करणे.
- मुलांच्या कृतिशीलतेचा, कार्यशक्तीचा विकास सहेतुक उपक्रमांतून साधण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- व्यक्तिगत व सामाजिक जीवनासाठी आवश्यक अशा मूल्यांची जोपासना करणे.
- बालकांमधील विविध बुद्धिमत्तांचा शोध घेणे.

निर्मिती

# ग्राममंगल

प्रकल्प : स्नेहनगरी, ऐना, ता. डहाणू,
जि. ठाणे ४०१६०७

अनुताई वाघ शिक्षण केंद्र, विक्रमगड,
ता. विक्रमगड, जि. ठाणे.

कार्यालय : ग्राममंगल,
गांधीभवन, अंधशाळेशेजारी,
कोथरूड, पुणे ४११ ०३८.

'रश्मी' ३/९ यशश्री कॉलनी, नवसह्याद्री
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे ४११०५२
☎ ०२२- ३०९१८६१७

बालशिक्षणात पथदर्शक म्हणून कार्य करणारी
नोंदणीकृत सामाजिक संस्था.